**शपथेवर पुढील सरतपास श्री. बी. व्ही. ठाकरे अधिवक्ता अर्जदारातर्फे :—**

०८. शपथपत्र **नि.क्र. यु—२४** मला दाखविले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर माझे सांगितल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे. कागदपत्र नि. यु—०२ सोबत अनु. क्रमांक १ ते ३ वर मी अधार कार्डच्या पडताळणी केलेल्या प्रती सादर केलेल्या आहेत. त्यास **नि. यु—२५ ते यु—२७** देण्यात आले. कागदपत्र नि. यु—०२ सोबत अनु क्र ४ वर माझा मुलगा मंगेश याचे मृत्यू प्रमाणपत्राची पडताळणी केलेली प्रत, अनु क्रं. ५ रेशन कार्डची पडताळणी केलेली प्रत, अनु क्रं. ६ वर माझी मुलगी मंगला हीचे अपंगत्व प्रमाणपत्राची पडताळणी केलेली प्रत, अनुक्रमांक ७ वर एफ. आय. आर. ची प्रत, अनु क्रं. ८ वर लाश सुपरतनामाची, अनु क्रं. ९ वर घाट प्रमाणपत्र, अनु क्रं. १० वर पोस्ट मार्टमचे रिपोर्टची सत्यप्रत, अनु क्र ११ वर मोटार अपघाताच्या रिपोर्टची प्रत, अनु क्र १२ वर घटना स्थाळाची सत्य प्रत, अनु क्र १३ वर मरणोत्तर पंचनामाची प्रत, अनु क्र १४ वर मयताचा वाहन चालवीण्याच्या परवान्याची पडताळणी केलेली प्रत व अनु १५ वर मयताच्या बॅक पासबुकची पडताळणी केलेली प्रत दाखल केलेली आहे, त्यास **नि. यु—२८ ते यु—३९** देण्यात येते.

कागदपत्र नि. यु २ अनुक्रमांक १६ वर मी माझे वकीलामार्फत गैरअर्जदाला पाठवीलेल्या नोटीसची प्रत मला दाखवीली. त्यावर माझे वकील श्री चिलबूले यांची सही आह. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि. यु—४०** देण्यात येते. कागदपत्र नि यु—२ सोबत अनु क्रमांक १७ वर पोष्टाची पावती व अनु क्रमांक १८ वर पोहच पावती दाखल केली आहे त्यास **नि. यु—४१ व यु—४२** देण्यात आले.

पुढील सरतपास पूर्ण झाला.

सामनेवाला क्रमांक १ ते ३ यांचा पुकारा केला असता गैरहजर.

सामनेवाला क्रमांक १ व २ यांचा पुकारा केला असता त्यांचे अधिवक्ता गैरहजर.

**उलटतपास पुढील तारखे पर्यन्त तहकूब करण्यात आला :**

माझे समक्ष

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वा/—
(अ. दा. तिडके)
न्यायाधीश

दि. ११.१२.२०२५. कामगार न्यायालय, चंद्रपुर.